## :: ऋण निर्देश ::

औद्योगिकरणामुळे देशांच्या आर्थिक विकासास गती प्राप्त झालेली आहे. मात्र त्याचे बरे वाईट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ लागले आहेत. विशेषत: उत्पादनाच्या कार्यात सहभागी असणा-या श्रम या घटका-वर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन यंत्रसामग्री व उत्पादनाच्या नवीन पध्दती इ. मुळे जरी उत्पादनात भर पडत असली तरी त्याचे "श्रम" या घटकावर प्रतिकूल परिणाम होत आहेत. उदा. बेकारी, अपघात इ. भारतातील कापड उद्योग हा सर्वात जुना उद्योग आहे. मात्र अलिकडे या उद्योगाला अत्यंत बिकट परिस्थितीतून वाटचाल करावी लागत आहे. पर्यायाने या उद्योगात काम करणा-या कामगारांना बिकट परिस्थिती-तून वाटचाल करावी लागत आहे. म्हणजेच त्यांच्या आर्थिक - सामाजिक समस्यात एका अर्थाने भर पडू लागलेली आहे. सांगली जिल्ह्यातील माधवनगर येथील माधवनगर कॉटन मिलमधील कापड कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास व्हावा या जाणिवेने एम्.फिल्. (अर्थशास्त्र) च्या अभ्यासा-साठी सदर विषयाची निवड केली आहे.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर एम्.फिल्. (अर्थशास्त्र) या पदवीसाठी सदरचा शोध निबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. कारण एम्. फिल्. (अर्थशास्त्र) पदवीच्या विषय निवडीपासून अखेरपर्यंत माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. जे.एफ्. पाटील, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे मला मार्गदर्शक म्हणून लाभले हे मी माझे भाग्यच समजते. त्यांच्या सखोल ज्ञानाने, कुशल मार्गदर्शनाने व त्यांच्या क्रियाशील सहकार्या-मुळे मी हा शोध निबंध अल्प वेळेत पूर्ण करू शकले. त्यांनी केलेले मार्गदर्शन मौलिक आहे. त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागातील डॉ. आर.आर. दोशी, डॉ. व्ही.बी. जुगळे, डॉ. ए.ए. डांगे, प्रा. दांडगे, प्रा. ककडे, प्रा. गावडे व डॉ. कोळी या सर्व प्राध्यापकांचे मला वेळोवेळी सहकार्य लाभले, त्याबद्दल मी त्या सर्वांची ऋणी आहे. तसेच श्री अशोक साबळे, श्री शेख, श्री पोक्षे या कार्यालयीन सेवकांचे वेळोवेळी क्रियाशील सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

माझ्या एम्.फिल्.च्या प्रारंभापासून मला सहकार्य केलेले माझे पूर्वीचे रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज श्रीरामपूरचे प्राचार्य आणि सध्याचे रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. वत्सलाताई भोर यांचे ऋण शब्दांकित नाही. मी त्यांची शतशः ऋणी आहे.

माझे पति प्रा. श्री. भास्करराव कदम आणि मुलगा संग्राम कदम या दोघांचे मोलाचे, सक्रिय सहकार्य नसते तर मी हे काम करु शकले नसते. त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आहे.

माझे हितचिंतक डॉ. ननवरे सर (प्राणीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), डॉ. प्रतापराव माने, प्रा. बी.ए. पाटील, प्रा. एस्.सी. पाटील, डॉ.सौ. नलिनी महाडीक, प्रा. मंगल पाटील, मंगल माने, प्रा.सौ. प्रतिभा कदम, श्री. दिनकरराव संकपाळ या सर्वांच्या प्रेरणेने मला वेळोवेळी उत्साह आणला. प्राचार्य बी.एल्. शिंदे, डी.जी. कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा यांनी मला शोध प्रबंधाच्या शेवटच्या टप्प्यात केलेले मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल मी या सर्वांची मनःपूर्वक ऋणी आहे.

श्रीरामपूर, जि.अ. नगर कॉलेजचे माझे सर्व हितचिंतक, स्नेहांकित, सहकारी प्राध्यापक वर्ग या सर्वांच्या सदिच्छा व प्रोत्साहनाने मी हे शोध

प्रबंधाचे कार्य जोमाने करु शकले. माधवनगर कॉटन मिल मधील माहिती मिळविण्याच्या कामी भाई अजित सुर्यवंशी यांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ लेडिज होस्टेलच्या रेक्टर सौ. साळुंखे, सौ. भोसले यांचे ही सहकार्य मोलाचे आहे. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची शतश: ऋणी आहे.

माझ्या हा शोध निबंध कमीत कमी वेळेत पूर्ण करणारे श्री व्ही.डी. खाडे यांचे मला खास आभार मानायला हवेत. अत्यंत अल्प काळात त्यांनी उत्कृष्ट टायपिंग करुन दिले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

दिनांक : 21-12-94

सौ. प्रभा कदम

......